संतोष नार्वेकर लिखीत

# चार क्षण



चार क्षण तुझ्या आठवणींचे
माझ्या अंतरंगात ओतलेले
पराकाष्ठा झाली प्रयत्नांची
पण ते तिथेच गोठलेले

कवी

संतोष भिकाजी नार्वेकर
७०४ हरेकृष्ण अपार्टमेन्ट, एल. बी. एस. मार्ग,
टेलीफ़ोन एक्सचेंज जवळ, घाटकोपर (प.)
मुंबई - ४०००८६.
फ़ोन नं : ९९२००७०७७१

ई-मेल- sn.santosh77@gmail.com

© २०१० सर्वहक्क सुरक्षित

प्रकाशक आणि वितरक

ई साहित्य प्रतिष्ठान

ईमेल – esahity@gmail.com
(9869674820,9833844994)

डिझाईन

Last Bench Designs

# प्रकाशकाचे शब्द -

चारोळी हा काही नवीन प्रकार नाही . जुने संस्कृत श्लोक ते मनाचे श्लोक या सगळ्या चारोळ्याच. मात्र आताशा यांचा उपयोग मनातली सल किंवा हलचल व्यक्त करण्यासाठी ऊर्दू शेरांचा करतात तसा तरलपणे होतो आहे. चिरंजीव संतोष नार्वेकर हे या प्रांतातले जुने मुशाफ़िर आहेत. याच्या त्याच्या प्रेमाची जुळणी करण्यासाठी त्यांनी प्रेमपत्रं आणि या चारोळ्या लिहील्या (असं ते म्हणतात). पण त्यांच्या चारोळ्यांमध्ये याहून बरंच काही जास्त दिसलं म्हणून त्या प्रसिद्ध करण्याचं आम्ही ठरवलं. हे जास्त म्हणजे काय ? एक उदाहरण पहा...

वडाच्या पारंब्यांचं<br>
जमिनीवर प्रेम होतं<br>
त्या दोघांचं मिलन होऊ नये<br>
म्हणून वडाचं झाड वाढत होतं

आई वडलांचा विरोध कमीत कमी शब्दांत कसा जिवंत केला आहे पाहा. अंतर वाढवण्याची त्यांची जिद्द आणि मिलनाची यांची उत्कटता यांच्यातला हा अबोल संघर्ष कसा रसरशीत उभा झाला आहे , नाही ? ही चारोळी एका पत्रात आणि कुणाच्या तरी जगण्यात अमर झाली असेलच. पण घेऊ दे की इतर रसिकांना त्याचा स्वाद.

त्यांचा स्वभाव विनयी आहे. चार लोकांत मोठेपणा मिरवण्याचा नाही. त्यामुळे त्यांची चारोळी सुद्धा विनयशील आहे. सगळं काही सांगून सवरून वर म्हणते...

रात्र रात्र सोसलेलं<br>
असं थोडक्यात कसं मांडू<br>
आयुष्यभराचं दुःख हे<br>
चार ओळीत कसं मांडू ?

पण असं म्हणून गप्प बसत नाही... प्रेयसीला समजवणी देते।

तुझ्या बाबतीत लिहीताना
मी थोडासा थांबतो
काहीतरी लिहून पुन्हा
वहिचं पान फ़ाडतो

तिला कुतुहलात गुंग ठेवतो... याला सांगायचं तरी काय आहे एवढं ? आणि पुढे जाऊन तिलाच वर म्हणतो...

शब्दाविना कळावं
मागितल्याशिवाय मिळावं
धाग्याविना जुळावं
आणि स्पर्शावाचून ओळखावं

जणू काही याला शब्दांचं वावडंच आहे. पण हे खरं आहे की मनातल्या भावनांची गुंतागुंत शब्दांत, अगदी कवितेच्या शब्दांत माडणं सुद्धा अवघड जातं. संतोष एक छायाचित्रकार आहेत. पूर्णवेळ रंगसावल्यांच्या खेळात रमणारे. पण म्हणतात कसे...

कवितांच्या दुनियेत
किती मजा असते
एकटं एकटं वाटताना
अख्खी दुनिया बरोबर असते

हे जितकं खरं तितकंच हेही खरं . कुणाच्यातरी संगतीत असताना आपण त्याच्या किंवा तिच्या संगतीत असतो. मात्र कवितेच्या आणि शब्दांच्या जगातच नव्हे तर रंग किंवा सुरांच्या दुनियेतलाही

Thegiftwallpapers.com

हाच अनुभव असतो. यांच्या संगत असताना आपण सगळ्या जगाशी जोडलेले असतो. बिनतारी अनुभव असतो हा. ज्याने घेतला त्यालाच ठाऊक. म्हणूनच संतोष चिल्लर लवलेटर लिहिणाऱ्या भुमिकेतून बाहेर पडून कवी बनतात.

**तुला जपताना हल्ली दुःख**
**जवळपासच येत नाही**
**कदाचित माझ्याकडे त्यांना देण्याइतका**
**वेळच उरत नाही**

अशी एखादी ओळ त्यांची उंची दाखवते. प्रेमाच्या नशेचा अनुभव ते असा जपतात त्यांच्या ओळींतून . तो एक आत्मिक अनुभव असतो . मात्र त्यामागची व्यावहारिकता ते नजरअंदाज करत नाहीत.

**पावसात भिजताना**
**अश्रु दिसत नसतात**
**नुसत्या भावनेनं इथे**
**दोन मनं मिळत नसतात**

याचा अर्थ ते व्यावहारिकता आणि भावुकता यांचा मेळ घालतच जगतात असं नव्हे. त्यांच्यातला शब्द आणि रंगांत बुडालेला कलाकार सदोदित जागा असतो. तो त्याच्या अनुभवांतून जे उतरतो ते तुम्ही वाचावं आणि तुमचेही चार क्षण छान जावेत। शेवटी आयुष्य असतं काय महाराज ? हेच ते चार क्षण . उरलेला सगळा कोरडा व्यवहारच तर असतो !

म्हणून म्हणतो मित्रांनो. या चारोळ्या न समजता एक आवाहन समजा. आयुष्याने दिलेलं एक आमंत्रण म्हणून वाचा. पाऊस बना. मग तुम्हीही हेच अनुभवाल...

**मी नेहमीच रिमझिम बरसतो**
**आणि तुला सादही घालतो**
**तू एकदा तरी बघशील म्हणून**
**तुझ्या अंगणभर पसरतो**

व्यवसायाने एक व्हिडिओग्राफ़र असलो तरीही मित्रांसाठी
मी नेहमी त्यांचा मांडवली बादशाह च आहे, त्यांच्या
प्रेमातल्या अडचणींची मांडवली करणारा.. सुरुवातीला
प्रेमपत्रापासून सुरुवात झालेलं हे मांडवली प्रकरण
हळूहळू शेरोशायरी आणि नंतर चारोळ्यांकडे झुकलं.
या चारोळ्यातून तुम्हाला रातकिड्याची बेचैनी जाणवेल
याचं रहस्य ही येत्या भविष्यात उलगडेलच
या चारोळ्या तुम्हा रसिकांपर्यंत पोहचवण्यात
‘ई-साहित्य’ ची टीम, नामकाका (सुनिल सामंत)
ज्यांनी मला ब-याच वर्षांच्या मध्यंतरानंतर पुन्हा
लिहीण्यासाठी प्रवृत्त केलं आणि यामुळेच हा संग्रह
तुमच्यापर्यंत पोहचतोय. या संधीसाठी ई-साहित्य
प्रतिष्ठानचे आभार

आपला
संतोष भिकाजी नार्वेकर

मी फ़क्त माझ्या मनातलं
शब्दात मांडायचा प्रयत्न करतो
त्याची कविता होते आणि
तुमच्या टाळ्यांचा गडगडाट होतो

हा संग्रह माझ्या आईस भेट...



तिच्या पाणावलेल्या डोळ्यात
मला अनेक प्रश्न दिसतात
आणि तेच प्रश्न मला
प्रेमरुपी कोड्यात टाकतात

तुझा स्पर्श मला
नविनच जाणवला
कधीतरी सांडून
पुन्हा नव्याने गावलेला





पापणी लवते न लवते
तोच तुझी आठवण
हातात जरी नसली तरी
मनात तुझी साठवण

मला ठाऊक आहे
तुझं मला वळून वळून बघणं
ओठांवर जरी नसलं
तरी मनात माझं असणं





वडाच्या पारंब्यांचं
जमिनीवर प्रेम होतं
त्या दोघांचं मिलन होऊ नये
म्हणून वडाचं झाड वाढत होतं

आता नका सांत्वन करू
त्याचा काही उपयोगही नाही
त्या गोष्टी मी केंव्हाच विसरलो
आता त्याचे दुःख देखिल नाही





कवितांच्या दुनियेत
किती मजा असते
एकटं एकटं वाटताना
अखखी दुनिया बरोबर असते

सखे कशी विसरशील तू
आठवणी तुझ्यात माझ्या गुंफ़लेल्या
पारंब्याच्या झुल्यावर
माझ्या सोबत झुललेल्या





तसं सगळ्यांना नाही जमत
तुझ्यासारखं वागणं
ओठांवर जरी नसलं
तरी मनात माझं असणं

या येणा-या जाणा-या जाणिवांची
मला खुप भीती वाटते
जाणीव येताना दुःख घेऊन येते
आणि जाताना मात्र सुखं हिरावून नेते





चालताना हळूच दचकून
माझ्या कुशीत येणारी प्रेयसी हवी
प्रेमाच्या या सप्तरंगी वाटाचालीत
मला तुझी साथ हवी

हल्ली नसते भास होतात
तू बरोबर असल्याचे
लोकांना पक्कं कळलंय
मला वेड लागल्याचे





चंद्र आणि चांदण्या
यांचे खेळ आता जुने झाले
तुझ्या येण्याने गजबजलेल्या माझ्या
शहराचे रस्ते आता तुझ्या जाण्याने सुने झाले



रात्रभर तुझ्या आठवणीत
मी ता-यांनासुद्धा झोपू दिले नाही
रात्रभर त्या जागल्या पण
माझा विरह त्यांना कळलाच नाही



तू बरोबर असताना
फ़क्त तुला पाहणं
आणि नसताना तुझ्या सोबत
आठवणींच्या हिंदोळ्यावर झुलणं

रस्त्याच्या काठोकाठ श्रीमंताच्या
इमारतीचा बहार होता
त्या इमारतींमागे गरिबांच्या
घरावर पडला कहर होता





कधी कधी पडत असते
दुपारच्या जेवणाची भ्रांत
आणि करत होते ते पोटाची भूक
पाणी पिऊनी शांत

पुरे झाला हा खेळ आता
असं अजून किती चालायचं ?
बिनडोक माकडांसारखं
आपणही असंच पहायचं ?





रात्र रात्र सोसलेलं
असं थोडक्यात कसं मांडू
आयुष्यभराचं दुःख हे
चार ओळीत कसं मांडू ?




तुमचं आपलं बरं आहे
स्वतःच्या स्वप्नात गुंग राहणं
आणि आमचं मात्र
तुमच्या भोवती घुटमळणं



शब्दाविना कळावं
मागितल्याशिवाय मिळावं
धाग्याविना जुळावं
आणि स्पर्शावाचून ओळखावं
तुझं माझं प्रेम

देव जाणो तुला कसं जमतं
शब्दांसोबत खेळणं
सरळ रस्त्यावर
नागमोडी वळणं





माझ्या गालावरचे अश्रू
तुझ्या आठवणींसोबत गळतात
आणि गळताना मात्र
आपला ओलावा मागे सोडतात

काल तुझी अचानक आठवण झाली
तू पावसात भिजलेली
माझी बाजू पूर्ण न ऐकताच
तू मुकेपणाने निघून गेलेली





तुझं काय गं
तू येऊन पुन्हा जाशील
सुखावलेल्या जखमांवरच्या खपल्या
पुन्हा काढून जाशील ...!




तू दिलेल्या जखमा देखील हल्ली
हव्याहव्याश्या वाटतात
कदाचित त्या जखमांमूळेच
तुझ्या आठवणी ताज्या राहतात



तू स्वतःबद्दल किती सहजच सांगून गेलीस
माझ्याबद्दल ऐकायचं विसरुन गेलीस
माझं हृदय तर घेऊन गेलीसच
पण तुझं मात्र द्यायचं विसरुन गेलीस

मरण असेल तर ते
तुझ्या मिठीत असावं
नाहीतर आयुष्यभर जगणं
तुझ्यासोबत असावं





मरणाचं काय हो ते
येईलही तुमच्या आमच्या नकळत
आणि मागे फ़क्त ठेवून जाईल
भाववेड्या पणतीला जाळत

हल्ली स्वप्नांचं आणि माझं
तसं नातंच तुटलंय
कारण मन माझं हल्ली
तुझ्या आठवणीत बूडलंय





ती गेली आणि सगळं काही
अगदी निशब्द झालं
मी गायलो गाणं तिच्यासाठी
पण ते सूद्धा मुकेपणाने रडलं

तुझा प्रत्येक स्पर्श
अजुनही मनात तसाच आहे
तितकाच सुगंधीत
कुपितल्या अत्तरासारखा





तुझ्या हसण्यावर काय लिहू ?
ते तर पाहण्याजोगंच आहे
तुझ्या त्या वाकड्या कटाक्षावर काय लिहू ?
ते तर काळीज फ़ाडण्याजोगंच आहे

तुला जपताना हल्ली दुःख
जवळपासच येत नाही
कदाचित माझ्याकडे त्यांना देण्याइतका
वेळच उरत नाही





दिवाळीच्या कंदिलाला
पाच दिवस मान असतो
नंतर त्याचा जीव कपाटावरल्या
पेटीकडे गहाण असतो

तुझ्या बाबतीत लिहीताना
मी थोडासा थांबतो
काहीतरी लिहून पुन्हा
वहिचं पान फ़ाडतो





किती दा तरी तुला सांगितलं
सांग तुझ्या मनातलं
तुझ्या नाही जमलं तर निदान
ओळख कधी माझ्या तरी मनातलं

तुझे डोळे रोज सांगतात
मला तुझ्या मनातला होकार
पण मग मला काहीच बोलू देत नाही
तुझ्या ओठांवरचा नकार





मला फ़ार टोचतं
तुझं असं वागणं
मनाला सगळं बोलायचं असतं
पण तुझं शब्द ओठात दाबून ठेवणं

ThegirlWallpaper.com

तसं तू खुले आम कधी
भेटली पण नाहीस
आणि आता तर तू त्यातली
राहिली पण नाहीस





तशी तू रोजच माझ्या ह्दयात
माझ्या मनाच्या त्रिकोणात
आणि माझं मात्र अगदी वेड्यासारखं फ़िरणं
तुझ्या माझ्या अस्तित्वाच्या शोधात

रात किड्यांचं किरकिरणं कधी
कुणाला कळलंच नाही
रात्र भर त्याने रान राखलं
त्याची कुणाला जाणच नाही





माणसाचा विचार आणि कृती
ह्यात बराच फ़रक असतो
मन सांगते देवा दारी जा
पण हा नेमका तिथलीच वाट चुकतो

मी वाहत्या नदीकडे पुन्हा पुन्हा बघतो
मनात एकच विचार धावतो
हिचा संगम प्रत्येक वेळी
सागराकडेच का होतो ?





किती दिमाखात थाटतात हे
निवडणूकीचा मासळी बाजार
तुमच्या आमच्या सारख्या
गरिबांच्या कातडीचा मांसाहार

वाहत्या नदीसोबत पात्र
वाहते का कधी ?
सगळं काही असून तुझ्याशिवाय
पूर्ण आहे का मी कधी ?





तसं हल्ली नुसतंच
हसू पण येत नाही
आणि खोटी आसवे डोळ्यातून
काढता काढ़वत नाही

असं म्हणतात की प्रत्येक गोष्टीला
काहीतरी असतं कारण
मग असा तुझा अबोला का छेडतो
मला नुसताच विनाकारण





काल मनात आलं तुझ्यासाठी गजरा आणावा
पण मला शब्दच अपुरे पडले
रस्त्याने सरळ चालत घरी आलो
आणि शब्द माझ्या ओंजळभर पसरलेले


कडकडून भूक लागली की
पोट म्हणजे काय ते कळतं
आणि हातातला पैसा संपला की
गरिबीचं दुःख काय ते कळतं






तुज पुन्हा स्मरताना आज
वाहिल्या नयनी धारा
आठवणी तुझ्या आल्या घेऊनी
प्रेमरंगाच्या बरसत्या गारा

प्रेमाचा इंद्रधनू आणि अश्रुंचा ढग
ह्यांच एक अतूट नातं आहे
आपण विश्वासाची कितीही मोठ्ठी झाडे लावली
तरी आपलं आभाळ मात्र मोकळच आहे





हर्ष तुझाच स्पर्श तुझाच
तू दिलेल्या जखमांवर
हळूवार लागणारा
मर्म देखील तुझाच

पावसात भिजताना
अश्रु दिसत नसतात
नुसत्या भावनेणं इथे
दोन मनं मिळत नसतात





काल तुला पुन्हा पावसात भिजताना पाहिलं
आणि मन अगदी चिंब झालं
जाग आली तेंव्हा कळलं
तुझ्या सोबत फ़क्त स्वप्नच न्हालं

ठेच आणि अश्रु यांचं नातं
तसं जुनंच आहे
एकाला लाग़लं की दुसरा हळहळणं
हे तर साहजिकच आहे






अश्रुंच्या ओघळात वाहणं अता
तितकसं राहिलच नाही
जगलो असेन स्वतःच्या सुखासाठी जरी
पण दुस-याच्या दुःखाची अवहेलना नाही

शब्द न मजला कळला कधी
तो माझ्या दिशेने न वळला कधी
माझी व्यथा अगदीच साधी
पण कुणा सांगायचे न जमले कधी





स्वप्नांचा सारा आसमंत
त्याला जोडलेला तुझा किनारा
सखे दिवस सरला तुझ्या आठवणीत
अता मात्र रातकिड्यांचा पहारा

दुःखाचे सगळेच प्रयत्न
यशस्वी नसतात
आणि सुखाची स्वप्ने देखील
तितकीशी मोठी नसतात





चंद्र आणि चांदण्या यांच्यावर
अजुन किती लिहू ?
माझ्या आसवांची फ़ूले
अजुन तुझ्या ओंजळीत किती वाहू

तो बेभान बरसून गेला
आणि मी मात्र कोरडाच राहिलो
तुझ्या आठवणीच्या छताखाली
त्यावेळेस मी नकळत उभा राहिलो



मी नेहमीच रिमझिम बरसतो
आणि तुला सादही घालतो
तू एकदा तरी बघशील म्हणून
तुझ्या अंगणभर पसरतो

ती पहाट आणि तुझा हात
अजुनही तसाच डोळ्यात आहे
आता मात्र रणरणती दुपार आणि
पायाखाली सावली आहे





मला माहित आहे तू माझ्या
ओढीने धावत येतेस
आणि जवळ आलीस की मात्र
निशब्द उभी राहतेस

जेंव्हा कोणीही जवळ नसतं
तेंव्हा असतात तुझ्या आठवणी
मग सुरु होतो जीवघेणा खेळ
आणि सोबतीला डोळ्यात पाणी





प्रेम आणि आपुलकी यांचा
हा अनोखा मेळ आहे
आठवण हाच तर खरा
तुझ्यामाझ्या मधला दुवा आहे

मला कळतंय माझं मन
आजही तुझ्याकडे ग़हाण आहे
तू एक क्षण केलेल्या प्रेमाचे
मी अद्याप व्याज फ़ेडतो आहे






विचारांच्या ही पलीकडचा
मला प्रश्न पडलेला
तू भरलेल्या हातांनी
आणी मी मात्र सांडलेला

काल संध्याकाळी तू अचानक निघून गेलीस
आणि माझी रात्र अगदी सुन्न झाली
क्षणात रातकीड्यानं मनात घर केलं
आणि त्याची काळीज छेदणारी किरकिर सुरु झाली





बाप म्हणे मला माझा
पोरगा डोईजड नाही
पण रिकामी पोरगा त्याचा
आतून मन खाई

हल्ली तुझं सोबत असणं
पहिल्यापेक्षा वाढलंय
आणि तुझ्या आठवणींचं नातं
माझ्या स्वप्नांसोबत जुडलंय





तुला नुसती ठेच जरी लागली
तरी माझं काळीज हलतं
माझं सर्वस्व तुझ्यात अडकलंय
ते मात्र तुला कुठे कळत
.

माझ्या हळूवार मनाला
अलगद भावनांचा कळस
तुझ्या स्वप्नांना मात्र माझ्या
अस्तित्वात येण्याचा आळस





किनारा संथ होता आणि
दोघांच्या मनात वादळ उठलेलं
मी फ़क्त तुला वर ठेवण्याचा प्रयत्न केला
तू बुडत गेलीस आणि तळ मात्र मला दिसलेला

रोज रोज जाऊन मळलेल्या पाऊल वाटेवर
जसे अनुकुचिदार कोचे अचानक उभे राहतात
तसंच खुप सुखाच्या वाटेवरून चालताना
अचानक दुःखाचे कोचे उभे राहतात





मैत्री ही मैत्री सारखी असावी
तिची एक वेगळीच बंदिश असावी
जणू दूःखानी भाजलेल्या जखमेवर
सुखाची अलगद फ़ुंकर असावी




दिवस अगदी भुर्र्कन उडून जातात
गेलेल्या दिवसांच्या आठवणी मागे साठतात
साठलेल्या आठवणी हीच तर आपली पूंजी असते
अशा आठवणींवर भावी आयुष्याचे स्तंभ उभे असतात



माझिया मन वृक्षावर
तुझिया आठवांचेच थवे
रोजच पाहतो त्यांना
आणि रोजचेच ते नवे

रात राणी कधीची बहरायची थांबलीय
आणि मला तिच्या बहरण्याची आस
तू येऊन जातेस निघून आणि मागे उरतात
तुझ्या स्पर्शाचे भास






आयुष्य हेच आहे
जगणे ह्यालाच म्हणतात
जे नाही त्याला मिळवायचा प्रयत्न
आणि जे आहे त्याला भंगार म्हणतात

---